जा.क्र.प्रा./प्रा.शा./आप्रशा/मान्यता/पुवि/२००१ ९६८८/२८
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१, यांचे कार्यालय.
दिनांक : 29 SEP 2001

प्रति,

शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, पुणे.
२. प्रशासन अधिकारी,
~~मनपा/नपा./ प्राथमिक शिक्षण मंडळ, जुना तोफखाना, शिवाजीनगर, पुणे-५.~~

विषय : सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत, माध्यम - मराठी

संदर्भ : शालेय शिक्षण विभागाकडील शासन पत्र क्रमांक व्हीएलस- १०००/(५५५/२००१/ (१)/प्रा.शि-३, दिनांक १९ जुलै, २००१

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणास कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या यादीतील प्राथमिक शाळांना त्यांचे नावा समोर दर्शविलेल्या माध्यमातून सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षापासून परवानगी घेण्याचे प्रस्तावित आहे.

अ.क्र.	संस्थेचे नांव	शाळेचे ठिकाण	माध्यम
१.	श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था, पुणे.	बारव ता. जुन्नर, जि. पुणे.	मराठी

त्यामुळे या संस्थाकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहित नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह १५ दिवसांच्या आत या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झालेनंतरच संबंधीत शाळांना परवानगी देणे/न देणे याबाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

१. संबधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.
२. संस्थेविरुध्द गंभीर स्वरुपाच्या तक्रारी नाहीत.
३. सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.
४. संबंधीत संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.
५. संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.
६. संस्थेने विहित नमुन्यात सुधारीत शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.
७. शासनाची मंजूरी नसतांना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.
८. संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.
९. संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.
१०. सक्षम अधिका-यांनी संबंधित संस्थांना मान्यता देतांना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येची प्रत्यक्ष तपासणी करुनच मान्यता प्रदान करावी.
११. सक्षम अधिका-यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकड्यांच्या संख्येपेक्षा जादा तुकडया संबंधीत संस्था उघडणार नाही, असे संबधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु.२०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.
१२. शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकडया संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. २०/- च्या स्टँपपेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे
१३. संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे. त्यावर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षाच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.
१४. संस्थेकडून रु. २०/- च्या कोर्टाच्या मुद्रांकित [illegible] संस्था कायमस्वरुपी विना अनुदान तत्वावर प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कायमस्वरुपी प्रत्यक्ष्या अनुदानाची मागणी करणार नाही हे हमीपत्र संस्थेकडून विहित घेणे आवश्यक आहे व याच्या छायांकित प्रती आपण आपल्या सबंधित नजीकच्या कायमस्वरुपी जतन करून ठेवाव्यात. माध्यमाची
१५. संस्थेने शाळेत नेमणूक केलेल्या शिक्षकांची माहिती सोबत देण्यात यावी. (उदा. नाव, जात, जन्मतारीख, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता)

उपसचिव (मा. उ. स. वाघ)

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग,पुणे-१

प्रत माहितीस्तव सविनय सादर
मा. अवर सचिव,शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-३२
२. मा. प्राथमिक शिक्षण संचालक, प्राथमिक शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,
श्री. शिवाजी मराठा शिक्षण संस्था, शिवनेरवाडा कल्याण वेस पेठ, जुन्नर
जि. पुणे.

Joshi/